# कार्यालय मध्यवर्ती संशोधन केंद्र,
# डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापिठ अकोला

दूरध्वनीक:- ०७२४-२२५८११९ ई-मेल:directorcrs78@gmail.com

जा.क्र.मसंके/~~[illegible]~~/ 570 /२०२६ RKVY दिनांक:- 21 / 07 /२०२६

**निविदा/ कोटेशन सूचना**

**विषय :- मध्यवर्ती संशोधन केंद्र,डॉ.पं.दे.कृ.वी.अकोला येथे प्रवाशी वाहन तसेच विविध फळझाडांची रोपे भाडेतत्वावर वाहनाने वाहतूक करण्यासाठी दर (कोटेशन) बोलविण्यासाठी व्यापक प्रसिद्धी करणेबाबत.**

वरील विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ.पं.दे.कृ.वी.अकोला येथे प्रवाशी वाहन तसेच विविध फळझाडांची रोपे भाडेतत्वावर वाहनाने वाहतूक करण्यासाठी निविदा दर खालील प्रमाणे अटी व शर्तीस अधीन राहून मागविण्यात येत असून निविदा/ कोटेशन मसुदा सोबत जोडलेला आहे.

अटी व शर्ती

1. निविदा पत्रक/कोटेशन कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १०.३० ते सायं. ५.३० वाजेपर्यंत स्वीकारल्या जातील.
2. कोटेशन /अंदाजपत्रक केवळ दिलेल्या तपशीलानुसारच विचारात घेतले जाईल. (नमूना सोबत जोडला आहे.)
3. निविदा मसुदा मध्ये नमूद केल्याप्रमाणे दर नमूद करावे. तसेच दर सर्व करासह (जिएसटी व इतर करासह) नमूद करावे.
4. वाहन चालकाच्या राहण्याची/ भोजनाची व्यवस्था करणे ही जबाबदारी निविदाधारकाची/ कंत्राटदाराची राहील. वाहनचालकने प्रवासादरम्यान कोणत्याही प्रकारचे व्यसन करता कामा नये.
5. मध्यवर्ती संशोधन केंद्र अकोला यांचे करिता उपरोक्त कामासाठी वाहतूक करतांना विद्यापीठाचे काही नुकसान झाल्यास विद्यापीठ प्रशासनाने ठरवून दिलेल्या निकषाप्रमाणे नुकसान भरपाई संबंधित निविदाधारक/ कंत्राटदारकडून वसूल करण्यात येईल.
6. मध्यवर्ती संशोधन केंद्र अकोला यांचे करिता प्रवाशी वाहन तसेच वाटिका येथून विविध फळझाडांची रोपे भाडेतत्वावर वाहनाने वाहतूक करण्यासाठी इंधन किंवा इंधनासाठी अग्रिम धनराशी मिळणार नाही.
7. मध्यवर्ती संशोधन केंद्र अकोला यांचे करिता उपरोक्त कामासाठी वाहतूक करतांना लागणारा टोल टॅक्स भरण्याची जबाबदारी सबंधित निविदाधारक/ कंत्राटदार यांची राहील.
8. मध्यवर्ती संशोधन केंद्र अकोला यांचे करिता उपरोक्त कामासाठी वाहतूक करतांना कुठलीही दुर्घटना/ अपघात/ जीवितहानी अथवा वाहन बिघाड झाल्यास हे कार्यालय किंवा कोणताही कर्मचारी/ अधिकारी किंवा विद्यापीठ जबाबदार राहणार नाही. याची सर्वस्वी जबाबदारी सबंधित निविदाधारक/ कंत्राटदार यांची राहील व त्यावर होणारा खर्च सुद्धा निविदाधारक/ कंत्राटदार यांना करावा लागेल.
9. विद्यापीठ प्रशासनाने वेळोवेळी निर्देशित केलेल्या नियमांचे पालन करणे संबंधित निविदाधारकांना बंधनकारक राहील.
10. नेमून दिलेले काम पूर्ण करण्यात यावे. कामाबाबत काही तक्रार आल्यास किंवा काम अर्धवट राहिल्यास सदर कामाचे देयक काढण्यात येणार नाही.
11. कोटेशन हे **संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पं.दे .कृ वी.अकोला** यांच्या नावाने असावे आणि त्यावर **"प्रवाशी वाहन तसेच विविध कलमे/ रोपे भाडेतत्वावर वाहनाने वाहतूक करनेबाबत कोटेशन"** लिफाफ्यावर (एनव्हलपवर) असा स्पष्ट उल्लेख असावा.

12. देयकावर जिएसटी नंबर असणे अनिवार्य आहे.
13. निविदाधारक/ कंत्राटदारांनी देयक सादर करतेवेळी बँक खाते बाबतची संपूर्ण माहिती सादर करावी अन्यथा अदा केले जाणार नाही.
14. मध्यवर्ती संशोधन केंद्र अकोला यांचेकरिता उपरोक्त कामासाठी वापरण्यात येणारे सुस्थितीत, सर्व परवाना मुदतीत असले पाहिजे. तसेच वाहन चालक जवळ सुद्धा वाहन चालकाचा योग्य तो परवाना असणे आवश्यक राहील. या संबंधी वाहतूक करतांना कुठलीही अडचण आल्या त्यास निविदाधारक/कंत्राटदार जबाबदार राहील.
15. निविदाधारक/कंत्राटदारास देयक काम पूर्ण व विहित वेळेत पूर्ण केल्यावर तसेच संबंधित विभागाचे प्रभारी अधिकारी यांनी काम समाधानकारक झाल्याचे प्रमाणित केल्यानंतरच कामाचे देयक पारित करण्यात येईल.
16. उपरोक्त काम करीत असताना कोणताही वाद विवाद निर्माण झाल्यास सदर वाद विवाद विद्यापीठ विधी विभागाचे अधिकारी/ मा.संशोधन संचालक, डॉ.पं.दे.कृ.वी.अकोला यांचे समक्ष मिटवला जाईल. व अंतिम निर्णय मा.संशोधन संचालक, डॉ.पं.दे.कृ.वी.अकोला यांचा राहील आणि तो सर्वांना मान्य करणे बंधनकारक राहील.
17. वरीलप्रमाणे अटी व शर्तीस अधीन राहून सोबत जोडलेल्या निविदा मसुदा तपशीलानुसार दि. ३०/०७/२०२६ रोजी पर्यंत कार्यालयीन वेळेत निविदा सीलबंद लिफाफ्यामध्ये सादर करावी.
18. प्रस्तुत केलेले दर कोटेशन उघडल्याच्या तारखेपासून **१ वर्ष** कालावधीसाठी वैध राहतील.
19. कोटेशन पुर्णपणे किंवा अंशत: स्वीकारण्याचा किंवा कारण न देता नाकारण्याचा अधिकार **मा. संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र,डॉ.पं.दे.कृ.वी.अकोला** यांचेकडे राखीव आहे.

**संचालक,**
**मध्यवर्ती संशोधन केंद्र,**
**डॉ.पं.दे.कृ.वी.अकोला**

# निविदा (कोटेशन) मसुदा

मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ.पं.दे.कृ.वी.,अकोला येथे प्रवाशी वाहन तसेच विविध फळरोपे वाटिका येथून विविध फळझाडांची रोपे भाडेतत्वावर वाहनाने वाहतूक करण्यासाठी दर (कोटेशन) खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्रं | तपशील | वाहनाचे प्रकार | एसी/ नॉन एसी | दर रु. |
|---|---|---|---|---|
| 1 | प्रवाशी वाहन | स्विफ्ट डिझायर | | |
| | | इनोव्हा | | |
| | | इर्टिका | | |
| | | महिंद्र बुलेरो xuv | | |
| 2. | माल/रोपे/वाहतूक | बोलेरो पिकअप | | |
| | | ४०७ | | |
| | | ट्रक | | |
| | | आयशर (Eicher) | | |
| | | Ashok Leyland Dost | | |
| | | Tata Intra | | |

निविदा सुचनेमधील संपूर्ण अटी व शर्ती मला मान्य आहेत.

ठिकाण :

दिनांक :

पुरवठादाराचे नाव व शिक्का